पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 27/03/2020 (शुक्रवार)
सायंकाळ

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 4 कि.मी. अंतरावरील बोरूजवाडा ओव्हर ब्रिज सावनेर ते छिंदवाडा बायपास रोड येथे दिनांक 25/03/2020 चे 20:00 वा. ते दिनांक 26/03/2020 चे 01:00 वा. दरम्यान अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरघाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन एमएच– 31 इजे– 2187 क्रमांकाच्या मोटरसाकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार फिर्यादीचा मोठा भाऊ नामे– राकेश गोरेलाल यादव, वय 24 वर्ष, रा. कवडस पाटणसावंगी व त्याचा मित्र नामे– रामबहादुर रामचंद्र गोपी, वय 30 वर्ष, रा. पाटणसावंगी या दोघांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेश गोरेलाल यादव, वय 19 वर्ष, रा. कवडस पाटणसावंगी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सतिश पाटील 8805253982 हे करीत आहे.

## पळवूण नेणे

पो.स्टे. नरखेड :– दिनांक 24/03/2020 चे 15.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान पो. स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय मुलीला अज्ञात आरोपीने फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी विरुध्द कलम 363 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेण सुरू आहे. गुन्हयाचा पुढील पोलिस हवालदार भुक्ते 9823612858 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर